## टीएमटीचा मनोरमानगर बसथांबा फेरीवाल्यांनी ढापला

### मनसेचे ठाणे परिवहन प्रशासनाला ५०० सह्यांच्या मागणीचे पत्र

ठाणे : बेकायदा फेरीवाले आणि अनधिकृत पार्किंगने मनोरमानगर येथील टीएमटी बस थांब्याला पुरते वेढले आहे. त्यामुळे प्रवाशांना बस पकडण्यासाठी द्राविडी प्राणायाम करावा लागतो. थांब्यावर बस उभी राहत नसल्याने नागरिकांची होणारी त्रेधातिरपीट रोखण्यासाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने मनोरमानगर परिसरात एकदिवसीय सह्यांची मोहीम राबवली. या ५०० नागरिकांच्या सह्यांसह निवेदन परिवहन प्रशासनाला सादर केले जाणार आहे. त्यामुळे बसथांब्याची या बजबजपूरीतून सुटका होण्याची शक्यता आहे.मनोरमानगर येथून दररोज हजारो प्रवासी ठाणे रेल्वे स्थानक परिसरासह आजूबाजूला जाण्यासाठी टीएमटी बस सेवेवर अवलंबून असतात. मात्र या बस थांब्यावर फेरीवाल्यांनी बस्तान मांडले आहे. तसेच २००६ पासुन महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने मनोरमानगर येथील या बस थांब्याबाबत परिवहन व्यवस्थापकाकडे वारंवार पाठपुरावा केला जात आहे. मात्र फेरीवाल्यांचे कारण देऊन या बस थांब्यावर चालकांकडून बस थांबवली जात नाही. या थांब्यापासुन १५० मीटर अंतरावर कोठेही बस थांबते. त्यामुळे प्रवाशांच्या या समस्येला वाचा फोडण्यासाठी महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेचे ठाणे उपशहर अध्यक्ष प्रमोद पत्ताडे यांनी नागरिकांच्या सह्यांची मोहीम राबवली. यावेळी ५०० पेक्षा अधिक प्रवाशांनी याठिकाणी असलेले फेरीवाले हटवून थांबा मोकळा करण्याची मागणी केली. यावेळी मनसे ठाणे सचिव निलेश चव्हाण, प्रभाग अध्यक्ष भास्कर चव्हाण, सहसचिव वसंत लोखंडे, बाळु कांबळे, विभागअध्यक्ष हेमंत मोरे, उपविभाग अध्यक्ष विशाल पाटील, शाखाअध्यक्ष आकाश वानखेडे, उपशाखा अध्यक्ष हेमंत गायकवाड, सचिन चाबुकस्वार, प्रीतम डुलगज, रवी शेंदाडे, आतिश कांबळे, आकाश शिंदे आणि शेकडो स्थानिक नागरिक उपस्थित होते.

# टीएमटीच्या बसना दुरुस्तीची प्रतीक्षा

## सुट्या भागांचा तुटवडा असल्यामुळे खोळंबा

ठाणे : लोकलसेवा बंद असल्यामुळे ठाणे महापालिकेच्या परिवहन उपक्रमाच्या (टीएमटी) बससेवेवर भार वाढत असताना उपक्रमाच्या २३७ बसगाड्या दुरुस्तीअभावी एका जागी उभ्या आहेत. 'बीएस-३' मानांकन असल्यामुळे या बसगाड्यांचे सुटे भाग मिळणे कठीण झाले आहे. परिणामी बसच्या दुरुस्तीला विलंब होत असून त्याचा परिणाम प्रवासी सेवेवर होत आहे.

ठाणे महापालिका परिवहन उपक्रमामार्फत महापालिका हद्द आणि हद्दीबाहेर १०४ मार्गावर प्रवासी सेवा पुरविली जाते. सद्यःस्थितीत दररोज दोन लाख प्रवाशी टीएमटीने प्रवास करतात. शहरातील लोकसंख्या लक्षात घेता हे प्रमाण वाढायला हवे. मात्र नादुरुस्त बस, दुरुस्तीस लागणारा वेळ यामुळे उपक्रमाच्या ताफ्यातील अध्र्याहून अधिक बस या आगारातच उभ्या असतात. टीएमटी व्यवस्थापनाने हा प्रश्न मार्गी लावण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकारच्या मदतीने २०० नव्या बस खरेदीचा प्रस्ताव तयार केला असला तरी सद्यःस्थितीत नादुरुस्त बसेसचे प्रमाण वाढू लागल्याने व्यवस्थापनाची डोकेदुखी वाढली आहे.



टीएमटी उपक्रमातील ६० टक्क्यांपेक्षा अधिक बसेस या जुन्या नामांकनाच्या असल्यामुळे सुटे भाग सहज उपलब्ध होत नाहीत ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळेच महापालिका प्रशासनाने नव्या नामांकनाच्या २०० बसेस खरेदीचा प्रस्ताव राज्य आणि केंद्र सरकारकडे ठेवण्याची तयारी सुरू केली आहे. या प्रस्तावावर सर्वसाधारण सभेचे मत जाणून घेतल्यानंतर पुढील कार्यवाही केली जाईल.
— संदीप माळवी, व्यवस्थापक टीएमटी

परिवहन उपक्रमातील सूत्रांच्या म्हणण्यानुसार, १० वर्षांपेक्षा जुन्या असलेल्या २३७ बसगाड्यांपैकी ६५ बस संचलनासाठी उपलब्ध असून उर्वरित बस नादुरुस्त अथवा देखभालीसाठी आगारात सतत उभ्या कराव्या लागतात. या सर्व बसगाड्या 'बीएस-३' मानांकनाच्या आहेत. केंद्र सरकारने वाहनांसाठी सद्यःस्थितीत बीएस-६ मानांकन लागू केले आहे. परिणामी 'बीएस-३' मानांकनाच्या बसचे सुटे भाग सहज उपलब्ध होत नाहीत. मूळ उत्पादकाकडे मागणी केल्यानंतरही हे सुटे भाग उपलब्ध होण्यात अडचणी उभ्या राहात आहेत. त्यामुळे दुरुस्तीची पुरेशी यंत्रणा उपलब्ध असूनही बस दुरुस्त करता येत नाहीत अशी परिस्थिती आहे.

### ३०० बसवर भिस्त

टीएमटीच्या ताफ्यात सद्यःस्थितीत ५१७ बस असून यापैकी २३७ बसचे वयोमान १० वर्षांपेक्षा अधिक आहे. ४० बसना ४ ते ५ वर्षांचा कालावधी लोटला असून २२० बस या चार वर्षांच्या आहेत. टीएमटीच्या ताफ्यात ५० बस नव्याने दाखल झाल्या आहेत. ५१७ पैकी २०२ बसगाड्या नादुरुस्त अवस्थेत किंवा दैनंदिन देखभालीसाठी आगारातच उभ्या असतात. म्हणजे, दररोज ३०० ते ३१५ बसगाड्यांतून दोन लाखांहून अधिक प्रवासी ये-जा करत असतात.

## मीरा भाईंदर महापालिकेच्या मोकळ्या जागांवरील कराची थकबाकी १०० कोटींच्या पार

मीरारोड - सर्व सामान्य नागरिकांना कोरोना संसर्ग काळात मालमत्ता करात ५० टक्के सवलत न देणाऱ्या मीरा भाईंदर महापालिकेने मोकळ्या जागांवरील करापोटी असलेली तब्बल १०० कोटी रुपयां पेक्षा जास्तीची थकबाकी मात्र बिल्डरां कडून वसूल करण्यास कमालीची टोलवा टोलवी चालवली आहे .

मीरा भाईंदर महापालिकेने उत्पन्नात वाढ व्हावी म्हणून मोकळ्या जागांवर कर आकारणी करण्यास सुरवात केली. भोगवटा दाखला घेई पर्यंत किंवा मालमत्ता कराची आकारणी होई पर्यंत मोकळ्या जागेवर कर लावला जातो . परंतु मोकळ्या जागांवरील कर आकारणीची सन २०२० - २०२१ ची एकूण मागणी विचारात घेतली तर थकबाकीची रक्कम तब्बल १०० कोटी १६ लाख ५५ हजारांच्या वर गेली आहे . ह्या पैकी मागील थकीत मागणी ७१ कोटी ७० लाख ७ हजार २९० तर चालू वर्षातील मागणी २८ कोटी ४६ लाख ४८ हजार २९८ इतकी आहे.

१०० कोटीच्या थकबाकी पैकी न्यायालयीन व इतर कारणांसाठी आलेली स्थगितीची एकूण रक्कम ८ कोटी ९० लाख ९९ हजार ३७५ इतकी आहे . त्यातील ७ कोटी ५२ लाख ३६ हजार ९६९ हि मागील तर चालू वर्षातील स्थगितीची रक्कम १ कोटी ३८ लाख ६२ हजार ४०६ इतकी आहे. मालमत्ता कर आकारणी किंवा भोगवटा दाखला दिनांका पर्यंत केलेल्या मोकळ्या जागेची कर आकारणी परंतु भरणा न केलेली रक्कम हि ७ कोटी १३ लाख ३० हजार ६५३ इतकी आहे.

त्यात मागील थकबाकी ६ कोटी ३७ लाख ३६ हजार ८५८ तर चालू वर्षातील थकबाकी ७५ लाख ९३ हजार ७९५ इतकी आहे . गंभीर बाब म्हणजे मोकळ्या जागेवरील कराची वेळीच वसुली न केली गेल्याने व्याजाची रक्कम सुद्धा तब्बल २४ कोटी ७६ लाख ३९ हजार इतकी झाली आहे . त्यातही मागील थकीत १५ कोटी ७२ लाख ८ हजार २७१ तर चालू वर्षातील व्याजाची रक्कम ९ कोटी ४ लाख ३० हजार ७४९ इतकी आहे. न्यायालयीन व वादातील प्रकरणे तसेच मालमत्ता कर व भोगवटा दाखला दिलेल्या थकीत रकमेला वगळून एकूण थकबाकीची रक्कम ५३ कोटी ३७ लाख ८४ हजार ६५० रुपये इतकी राहिली आहे असे प्रशासनाचे म्हणणे आहे.

## दीड महिन्यांत ४४४ जोडपी लग्नाच्या बेडीत



### टाळेबंदी शिथिल होताच दुय्यम निबंधक नोंदणी कार्यालयात विवाह नोंदणीत वाढ

ठाणे : करोनाचे संकट कायम असल्यामुळे अनेक जोडपी नोंदणीकृत विवाह करण्यास प्राधान्य देत आहेत. त्यामुळे नोव्हेंबर ते डिसेंबर महिन्यांत ठाणे दुय्यम निबंधक नोंदणी कार्यालयात तब्बल ४४४ जोडप्यांनी लग्नगाठ बांधल्याची नोंद करण्यात आली आहे. त्यासोबतच ठाणे दुय्यम निबंधक नोंदणी कार्यालयात सध्या दिवसाला १० ते १५, तर मुहूर्ताच्या दिवशी २५ ते ३० लग्न होत असल्याचे कार्यालयातर्फे सांगण्यात आले आहे.

राज्यात मार्च महिन्यापासून करोनाचा संसर्ग वाढू लागल्यामुळे सार्वजानिक कार्यक्रमावर तसेच विवाह सोहळ्यावर मोठय़ा प्रमाणात निर्बंध आले. त्यामुळे मार्च, एप्रिल आणि मे महिन्यांतील विवाहाचे मुहूर्त चुकले होते. त्यानंतर केवळ ५० व्यक्तींच्या उपस्थितीत विवाह सोहळा पार पाडण्याचे आवाहन राज्य सरकारतर्फे करण्यात आले होते. राज्य सरकारतर्फे विवाह सोहळ्यास परवानगी देण्यात आली असतानाही करोना संसर्गाच्या भीतीमुळे जिल्ह्य़ातील अनेक जोडप्यांनी विवाह रद्द केले होते. करोनाचा संसर्ग कमी होऊ लागला असून टाळेबंदीही शिथिल करण्यात आली असल्याने अनेक जोडपी या काळात विवाहबंधनात अडकत आहेत.दिवाळीनंतरचा काळ हा विवाहाचा हंगाम असतो. यंदाच्या वर्षी डिसेंबर महिन्यात विवाह मुहूर्त अधिक आले आहेत. करोनामुळे आर्थिक मर्यादाही आल्याने अनेक जण साध्या पद्धतीने नोंदणीकृत विवाह करण्यास प्राधान्य देत आहेत. त्यामुळे सध्या दिवसाला ठाणे दुय्यम निबंधक नोंदणी कार्यालयात १० ते १५, तर मुहूर्ताच्या दिवशी २५ ते ३० लग्न होत आहेत.

## रिक्षा वयोमर्यादेला मुदतवाढ मिळणार

मुंबई : करोनामुळे बंद पडलेल्या व्यवसायाला गती देण्यासाठी परिवहन आयुक्तालयाने हालचाली सुरू केल्या आहेत. मुंबईसह राज्यात धावणाऱ्या रिक्षांच्या वयोमर्यादेला एका वर्षापर्यंत मुदतवाढ देण्याचा प्रस्ताव आयुक्तालयाने राज्य सरकारकडे पाठवला आहे. या प्रस्तावाला मंजुरी मिळाल्यानंतर मुंबईसह उपनगरातील शेकडो रिक्षाचालकांना दिलासा मिळणार आहे.

'आधी काम मग दाम' या उक्तीनुसार चालणारा रिक्षा व्यवसाय अनलॉकनंतरही अद्याप पूर्वपदावर आलेला नाही. मार्चमध्ये लागू झालेले प्रवासी वाहतुकीचे निर्बंध वर्षाअखेरच्या टप्प्यात पोहचल्यानंतरही कायम आहेत. अद्याप पूर्ण क्षमतेने रिक्षा वाहतूक करण्याचे सुस्पष्ट आदेश सरकारने दिलेले नाहीत. यामुळे रिक्षाचालक धोका पत्करून प्रवासी वाहतूक करत आहेत.



राज्य परिवहन प्राधिकरणाने वयोमर्यादा पूर्ण झालेल्या रिक्षा प्रवासी वाहतुकीतून हटवण्याचे आदेश दिले आहेत. यंदा करोनामुळे राज्यातील रिक्षा प्रवासी वाहतुकीवर फार गंभीर परिणाम झाला. अनेकांची कमाई बुडाली, कर्जाचे हप्ते थकले. अशा स्थितीत वयोमर्यादेमुळे रिक्षा हातची गेली, तर अडचणीत आणखी भर पडणार आहे. त्यामुळे एका वर्षाची मुदतवाढ देण्याच्या सूचना बैठकीत करण्यात आल्या होत्या, असे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सांगितले.'करोनाच्या पार्श्वभूीवर व्यवसाय बंद होते. गाड्या जागीच उभ्या होत्या. यामुळे वयोमर्यादा पूर्ण झालेल्या रिक्षाला एका वर्षाची मुदतवाढ द्यावी', असा प्रस्ताव राज्य सरकारकडे पाठवला आहे, असे राज्याचे परिवहन आयुक्त अविनाश ढाकणे यांनी सांगितले. राज्यात रिक्षांची संख्या आठ लाखांच्या वर आहे. वयोमर्यादा पूर्ण झाल्यामुळे मुंबई आणि उपनगरातील मिळून साधारण चार ते सहा हजार रिक्षा दरवर्षी भंगारात जातात. मुंबई महानगर प्रदेशात हाच आकडा आठ हजारांच्या वर असू शकेल, असे रिक्षा वाहतुकीतील जाणकार सांगतात. रिक्षाचालकांच्या मागण्या रिक्षा वाहतूक करणाऱ्या चालकांना करोनाकाळात सरकारने कोणताही दिलासा दिलेला नाही. रिक्षाची वयोमर्यादा वाढवण्यासह कल्याणकारी मंडळ स्थापन करणे, मासिक उदरनिर्वाहासाठी रोख रक्कम आणि सार्वजनिक प्रवासी वाहतूक करण्यास विनाअट परवानगी या मागण्या आम्ही केल्या आहेत, असे मुंबई ऑटो रिक्षा-टॅक्सीमेन्स युनियनचे अध्यक्ष शशांक राव यांनी स्पष्ट केले.

### बाप लेकीवर गुन्हा दाखल,

## ऑनलाईन चलान दिल्याच्या रागातून वाहतूक पोलिसाला मारहाण

उल्हासनगर : विठ्ठलवाडी पोलीस ठाण्याच्या समोर शहर वाहतूक विभागाची वाहनांची पाहणी आणि कारवाई दरम्यान वाहन परवाना व कागदपत्र जवळ नसल्याने ऑनलाईन चलन दिले. या रागातून वाहतूक पोलिसाला मारहाण व शिवीगाळ झाल्याची घटना बुधवारी सायंकाळी ७ वाजता घडली. याप्रकरणी बाप-लेकीवर विठ्ठलवाडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असून पोलीस अधिक तपास करीत आहेत.

शहर वाहतूक शाखा उपविभाग विठ्ठलवाडी यांच्या वतीने वाहतूक पोलीस गणेश चौधरी हे बुधवारी सायंकाळी ७ वाजता विठ्ठलवाडी पोलीस ठाण्याच्या सामोरील रस्त्यावर वाहनांची पाहणी व कायदेशीर कारवाई करीत होते. त्या दरम्यान ऍक्टिव्ह गाडीवर आलेल्या मनोज गुरुनानी यांच्याकडे वाहन परवाना व संबंधित कागदपत्र जवळ नसल्याने, ७०० रुपयाचे ऑनलाईन चलन दिले. याप्रकाराने गुरनानी व त्यांच्या सोबत असलेली त्यांची मुलगी संतप्त झाली. गेल्या आठवड्यात माझ्या भावालाही चलन दिल्याचे सांगत शिवीगाळ सुरू केली. तसेच पोलीस नाईक चौधरी यांना मारहाण केली. यावेळी पोलीस कर्मचारी किरण धांडे व पोलीस मित्र स्वप्नील जाधव उपस्थित होते. वाहतूक पोलिसांनी होणाऱ्या मारहाणीचा सर्वत्र निषेध व्यक्त होत आहे.

## दिल्ली येथील शेतकऱ्यां च्या आंदोलनाला नवी मुंबई वंचितचे पाठिंब्याचे निवेदन

नवीमुंबई- वंचीत बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ळासाहेब आंबेडकर यांच्या आदेशाने महाराष्ट्र मध्ये जिल्हाधिकाऱ्यांना दिल्लीमध्ये होत असलेल्या शेतकरी बांधवांच्या आंदोलनास जाहीर पाठिंबा देण्यासाठी निवेदने देण्यात येत आहेत त्याचधरतीवर नवी मुंबई जिल्ह्याच्या वतीने वंचित बहुजन आघाडी च्या सर्व आजी-माजी पदाधिकारी व महिला आघाडी यांच्या माध्यमातून कोकण भवन येथे कोकण उपायुक्त यांना नवी मुंबईच्या वतीने दिल्लीतील शेतकऱ्यांना जाहीर पाठिंबा चे निवेदन देण्यात आले वंचीतचे नवीमुंबई जील्हा निरिक्षक आनंद जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली व माजी जिल्हाध्यक्ष विरेंद्र लगाडे यांच्या नेतृत्वाखाली निवेदन देण्यात आले यावेळी ऐरोली तालुक्याचे नवनिर्वाचित तालुकाध्यक्ष मिलिंद खरे , नवी मुंबई जिल्ह्याच्या नवनिर्वाचित महिला अध्यक्ष शिल्पाताई रणदिवे , विशाल टोणगे. आनंद




बोधी. संजय धनके. गौतम गायकवाड. किशोर साळवे. काशिनाथ पवार. सुनील साळवे. बाबासाहेब मेहेते. सुनील गायकवाड. बाबुराव भालेराव. किशोर अवसरमल. दिलीप गायकवाड. अरुण गायकवाड. अशोक शेगावकर. सुभाष बलखंडे. अशोक मनोहर. शंकर पडळकर. गौतम चव्हाण. अंकुश गायकवाड. अमोल रणदिवे .कल्याण हनवते .तुषार पवार .राहुल जाधव. रमेश जाधव .अशोक शिरसाट. राहुल शिरसाट. नमिता भालेराव. सीमा कांबळे. जानकी आनंद. मंगल साबळे. राखी बनसोडे. रोहिणी कांबळे. माया मनोहर .संगीता गायकवाड. दुर्गा सिंगारे यांच्यासह असंख्य कार्यकर्त उपस्थीत होते.

## सागरी सेतूसाठी खारफुटीतोडीस मंजुरी

### ९ खांबांच्या उभारणीतील अडथळा दूर

मुंबई : वर्सोवा-वांद्रे सागरी सेतूच्या नऊ खांबासाठी खारफुटी तोडण्यास दिलेली स्थगिती उच्च न्यायालयाने बुधवारी उठवली. त्यामुळे महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाला (एमएसआरडीसी) दिलासा मिळाला आहे.वर्सोवा-वांद्रे सागरी सेतूसाठी नऊ खांब बांधण्यात येणार आहेत. झोरू भथेना यांनी केलेल्या याचिकेतील आरोपांची दखल घेत सेतूसाठीच्या एक खांबासाठी १५० चौरस मीटरपेक्षा जास्त खारफुटी तोडण्यात येऊ नये असे आदेश न्यायालयाने गेल्या वर्षी सप्टेंबर महिन्यात दिले होते. त्यामुळे प्रकल्पाचे काम रखडले होते.

**ENBEE TRADE AND FINANCE LTD.**
CIN No: L50100MH1985PLC036945
REGD. Office: B4/C5, Gods Gift Chs Ltd., N.M. Joshi Marg, Lower Parel, Mumbai 400013. Ph: 022-24965566, Fax: 022-24965566
Email ID:enbeetrade@gmail.com; Website: www.enbeetrade.com

**CORRIGENDUM**

With reference to the Annual Report provided to the shareholders of the Company and subsequent advertisement published in this newspaper on December 02, 2020 regarding dispatch of Annual Report along with the Notice of 35th Annual General Meeting to be held on Monday, December 21, at 11:30 a.m. at the registered office of the Company, there were certain inadvertent omissions / typographical errors in the Annual Report.
In regards to the above stated matter, you are requested to take a note of the following
1. On page 4 of the report the following resolution to be added in the resolutions to be passed at the annual general meeting of the Company:
3. To consider and if thought fit, to pass, the following Resolution as an Ordinary Resolution: Re-appointment of Statutory Auditors of the Company:
**RESOLVED THAT** pursuant to the provisions of Section 139 and other applicable provisions, if any, of the Companies Act, 2013 read with the Companies (Audit and Auditors) Rules, 2014, M/s Ambavat Jain And Associates LLP, (Registration No. 109681W) be and are hereby re-appointed as the Statutory Auditors of the Company to hold office for their second term of 5 (five) years from the conclusion this Annual General Meeting till the conclusion of Annual General Meeting for the financial year 2024-25 on such remuneration as may be decided by the Board.
2. On page 27 the remuneration paid to Mr Amar Gala has been stated as Rs.24,00,000 and that of Ms. Samta Gala as Rs.6 00,000, the same is to be taken as Mr Amar Gala Rs.25,50,000 and that of Ms. Samta Gala as Rs.7,50,000 and the total amount to be taken as Rs.33,00,000
3. On page 28 the remuneration paid to CFO has been stated as Rs.18,00,000 the same is to be taken as Rs.21,00,000

The Annual Reports should be treated as amended to the said extent.
This corrigendum to the notice is issued to all the members of the Company and the Stock Exchange as well as others entitled thereto, pursuant to Section 101 of the Companies Act, 2013. Thus the Directors Report shall always be read with this Corrigendum.

**For Enbee Trade and Finance Limited**
**Sd/-**
**Amar Gala**
**Managing Director**
**DIN: 07138963**
**Date: December 16, 2020**
**Place: Mumbai**

# उपासमारीमुळे आजारी बिबट्या मानवी वस्तीनजीक

### हॉटेलजवळील झाडीतून बाहेर काढण्यात यश; बोरिवलीतील उपचार केंद्रात रवानगी

ठाणे : येऊरमधील हॉटेल परिसरात आढळून आलेल्या बिबटय़ाचा शोध घेण्यात वनविभागाच्या पथकाला बुधवारी यश आले. पाच दिवसांपेक्षा अधिक काळ अन्न न मिळाल्याने तसेच जुलाब आणि ताप यांमुळे हा बिबटय़ा कमालीचा अशक्त झाला होता, अशी माहिती संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या अधिकाऱ्यांनी दिली. त्याला पुढील उपचारासाठी बोरिवलीतील बचाव केंद्रात दाखल करण्यात आले आहे.

येऊर येथील 'लाइट हाऊस' या हॉटेलच्या मागे मंगळवारी सायंकाळी एक बिबटय़ा ग्रामस्थांना आढळून आला होता. याची माहिती ग्रामस्थांनी संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील येऊर वन परिक्षेत्र अधिकाऱ्यांना दिली होती. त्या वेळीच हा बिबटय़ा आजारी असावा, असा अंदाज ग्रामस्थांनी व्यक्त



केला होता. त्यानंतर येऊर वन परिक्षेत्रातील अधिकाऱ्यांनी तात्काळ त्या ठिकाणी जाऊन पाहणी केली. त्या वेळी पथकाला हा बिबटय़ा आढळला. मात्र तो अशक्त असल्याने त्याचा जीव वाचविण्यासाठी त्याला पकडणे अत्यंत आवश्यक होते. त्यानंतर संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील बचाव पथकाचे अधिकारी, पशुवैद्यकीय अधिकारी हे घटनास्थळी दाखल झाले. मात्र सायंकाळी काळोख पडू लागला. बिबटय़ा आक्रमक होण्याची शक्यता असल्याने पथकाने बचावकार्य थांबविले. त्यानंतर बुधवारी सकाळी पुन्हा पथकाने बचावकार्य सुरू केले. त्या वेळी शोधमोहिमेत हा बिबटय़ा लाईट हाऊस हॉटेल परिसरातील एका झाडीमध्ये बसल्याचे दिसून आला. बचाव पथक जवळ येत असल्याचे पाहताच अशक्त दिसणाऱ्या या बिबटय़ाने एक मोठी डरकाळी फोडली. त्यामुळे बचाव पथकालाही घाम फुटला. त्यानंतर या बिबटय़ाने आश्रयाची जागा बदलली. तो चालत असताना त्याचा तोलही जात होता. बिबटय़ा पुढे गेल्यानंतर पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्याला गुंगीचे इंजेक्शन दिले. त्याची तपासणी केली असता, त्याला जुलाब, ताप आणि अन्नपदार्थ न मिळाल्याचे निष्पन्न झाले. त्याला पुढील उपचारासाठी संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील बचाव केंद्रात दाखल करण्यात आले आहे.

### बिबट्याचा एका कर्मचाऱ्यावर हल्ला

या शोधकार्यादरम्यान, बचाव पथकाने एक डार्ट बिबटय़ाच्या दिशेने मारला. मात्र, झुडपे असल्याने हा डार्ट लागला नाही. त्यानंतर आक्रमक झालेल्या बिबटय़ाने बचाव पथकातील एकावर पंजाने हल्ला हातावर हल्ला केला. सुदैवाने या कर्मचाऱ्याला केवळ खरचटले होते.

### भक्ष्यासाठी मानवी वस्तीत

येऊर जंगलातून हा बिबटय़ा आला आहे. पाच दिवसांपासून हा बिबटय़ा उपाशी असण्याची शक्यता वन परिक्षेत्र अधिकारी राजेंद्र पवार यांनी व्यक्त केली आहे. तसेच या बिबटय़ाला जुलाब आणि ताप असल्याने तो अशक्त झाला होता. त्यामुळे भक्ष्याच्या शोधात तो जंगलातून खाली असलेल्या लोकवस्तीच्या परिसरात आला असावा, असा अंदाज व्यक्त केला जात आहे.